CNR No. MHRG080002952026

**फौ.कि.अर्ज.क्र. ३१/२०२६**

राजेश गोवर्धनदास शाह

**विरुध्द**

सरकार तर्फे खोपोली पोलिस ठाणे

**निशाणी क्र.१ खालील आदेश**

१. अर्ज व त्यावरील सरकारी अभियोक्ता व अन्वेषण अधिकारी यांनी दाखल केलेले लेखी म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

२. अर्जदार **राजेश गोवर्धनदास शाह** यांनी दिनांक २६/०७/२०२५ रोजी सकाळी अर्जदार नाश्ता करत असतांना अर्जदार यांनी त्यांचे मोबाइल वर एस.एम.एस. तपासत असतांना त्यांना समजले की, त्यांच्या बँक खाते क्रमांक ९९८७०१०००४८६२ मधून एकुण **रक्कम रु.१,९९,९९९/-** एवढी रक्कम चार हप्त्यामध्ये म्हणजेच **रक्कम रु.४९,९९९.९९/-** त्यांच्या पूर्वकल्पना नसतांना कपात झाल्याचे निदर्शनात आले. त्यांनतर त्यांनी मोबाईल वरील एस.एम.एस. तपासले असता एस.एस.एस. मध्ये सदर रक्कम सलग दोन दिवस म्हणजेच दिनांक २५/०७/२०२५ व दिनांक २६/०७/२०२५ या तारखेला सुमारे सकाळी ०७:०० वाजता कपात झाल्याचे समजले.

३. सदर अर्जदार त्यांचे बँक खात्यातील रक्कम तपासली असता अर्जदार यांना रक्कम कपात झाल्याचे दिसून आले. तेव्हा अर्जदार यांना त्यांचे सोबत सायबर फ्रॉड झाल्याचे समजले असून अर्जदार यांनी त्वरीत सायबर शाखेच्या १९३० या

ऑनलाईन हेल्पलाईन सर्विस नंबरवर तक्रार नोंदविलेली आहे. सदर तक्रार सायकर **ACKNOWLEDGEMENT NO. 31907250127529** एनसीआरबी पोर्टल अर्ज केला.

४. अर्जदार यांचे Bank of Baroda Branch Khopoli खाते क्र.९९८७०१००००४८६२ (IFSC CODE BARBODBKHOP) या बँक खाते मधून ऑनलाइन सायबर फसवणूक दरम्यान रक्कम वळती झालेली बँक खाते तपासकामी पोलिसांनी गोठविलेले असून सदरील बँक खाते मध्ये गोठविलेली रक्कम अर्जदार यांना त्यांचे बँक खाते मध्ये परत करणेकरीता हुकूम होणेकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

५. अर्जदार यांनी अर्जाचे पुष्ट्यर्थ निशाणी क्र. ४ सोबत अर्जदार यांनी नोंदविलेली ऑनलाइन सायबर क्राइमची प्रत, अर्जदार यांचे बँक स्टेटमेंटची प्रत, अर्जदार यांनी यू.पी.आय. ट्रान्सेक्शन प्रत. इ. कागदपत्रे अर्जदार यांनी दाखल केलेली आहेत.

६. सदर कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत तक्रार अर्जदार यांनी दिलेली आहे. त्यावर तपासी अधिकारी यांनी म्हणणे दाखल केले त्याप्रमाणे त्यांनी अटी व शर्थीवर रक्कम रुपये १,००,४००.४०/- एवढी गोठवलेली असुन तो मुद्देमाल परत करण्यास हरकत नाही असे म्हणणे दाखल केले आहे. सरकारी अभियोक्ता यांनी अर्जदारचा अर्ज ना मंजूर करण्यात यावा असे म्हणणे दिलेले आहे.

७. अर्जदार यांनी गुन्ह्याच्या अनुषंगाने ऑनलाईन सायबर क्राईम क्र. ३१९०७२५०१२७५२९ हा गुन्हा नोंदविलेला आहे. सदर प्रकरणातील ऑनलाईन

सायबर क्राईम तक्रारीचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, तपासाअंती पोलीसांना वर नमुद रक्कम ही अर्जदार यांचे बँक खात्यातून ज्या बँक खात्यात पैसे वळते झालेले आहेत ती बँक खाते खोपोली सायबर पोलिसांनी तपासादरम्यान गोठवलेले आहेत. तसेच अर्जदार यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही सदरच्या गोठविलेल्या रक्कमेची मागणी केलेली नाही. त्यावरुन असे स्पष्ट होते की, अर्जदार हेच सदर गोठविलेल्या रक्कमचे मालक आहेत.

८. सदर खात्यांमधील ट्रान्सफर केलेली रक्कम रु. १,९९,९९९/- ही अर्जदार श्री. राजेश गोवर्धनदास शाह यांचे बँक खातेमधून ट्रान्सफर केलेली असून ती रक्कम अर्जदार यांचे बँक खात्यातून ज्या बँक खात्यात पैसे वळते झालेले आहेत ती बँक खाते खोपोली सायबर पोलिसांनी तपासादरम्यान गोठवलेले आहेत. म्हणून गोठविलेली रक्कम अर्जदार यांना परत देणे काही अटी व शर्तींवर न्यायोचित होईल. सबब, अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. तपास अधिकारी यांना असा आदेश करण्यात येतो की, तपासादरम्यान खाली नमुद केल्याप्रमाणे बँक खात्यांमध्ये गोठवलेली एकूण रक्कम रु. १,००,४००.४०/- ही अर्जदारच्या बँक ऑफ बडोदा, शाखा खोपोली खाते क्र. ९९८७०१००००४८६२ (IFSC CODE BARBODBKHOP) यावर अर्जदार श्री. राजेश गोवर्धनदास शाह यांना खालील अटींवर परत करण्यात यावी.

अ) ज्या खात्यामध्ये पैसे वळते झाले ते बँक खाते खालीलप्रमाणेः

१) अर्जदार यांच्या बँक खात्यामधील वर्ग झालेली रक्कम रु. १,९९,९९९/- पैकी रक्कम रुपये १,००,४००.४०/- खालील खात्यांवर गोठवण्यात आलेली आहे.

अ. बँक ऑफ इंडीया खाते क्र. ६०३२२०९१००००००३ सदर खाते EPIC QUEST ADVENTURES PRIVATE LIMITED यांच्या नावे आहे. 5547-A, Shop No. 5, 3rd Floor, School Block, Shakrapur East, Delhi- 110092 या खात्यावर अनुक्रमे १,००,०००/- (एक लाख मात्र).

ब. बँक ऑफ इंडीया खाते क्र. ७४३३१०११००००२९९ सदर खाते अरविंद कुमार (S/o. निरंजनलाल), पत्ता हरदोई, उत्तरप्रदेश २४१३०४ यांच्या खात्यावर रक्कम रुपये ४००.४०/- (चारशे मात्र) एवढी गोठविण्यात आलेली आहे.

२) अर्जदाराने रक्कम रु. १,००,५००/- चा सुपुर्तनामा तपासी अंमलदार यांच्या समक्ष सादर करावा. सदर तयार सुपुर्तनामा तपास अंमलदार यांनी दोषारोप पत्रासोबत न्यायालयात दाखल करावा.

३) अर्जदार यांनी न्यायालय आदेश करील तेव्हा त्यांना परत मिळालेली रक्कम न्यायालयात हजर करायची आहे.

४) रोख रक्कम अर्जदाराला देण्यापुर्वी तपास अधिकारी यांनी त्याबाबतचा संपुर्ण पंचनामा करावा व ते कागदपत्र दोषारोप पत्रासोबत न्यायालयात दाखल करावे असे अन्वेषण अधिकारी यांना निर्देशित करण्यात येते.

SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Digitally signed by SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Date: 2026.06.22 17:57:33 +0530

**( एस. एस. देशमुख )**

स्थळ – खालापूर.
दिनांक – २२/०६/२०२६.

दिवाणी न्यायाधीश क. स्तर व
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, खालापूर.

## Certificate

I affirm that, the contents of the P.D.F. file order are same word to word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Court Name | : | Smt. S. S. Deshmukh<br>CJJD & JMFC, Khalapur |
| Name of Steno | : | Shri. Rakesh S. Patil<br>Stenographer, Grade – III |
| Date of Order | : | 22/06/2026 |
| Order signed by P. O. On | : | 22/06/2026 |
| Date of PDF & Order uploaded on | : | 22/06/2026 |